# MUHS, नाशिक डिजिटल कन्सोर्शिया EBSCO orientation कार्यक्रम अहवाल

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांच्या डिजिटल कन्सोर्शिया (EBSCO) संदर्भातील अभिमुखीकरण (Orientation) कार्यक्रम टिळक आयुर्वेद महाविद्यालयाच्या NIMA सभागृह व वर्ग क्र.1 मध्ये दिनांक 18 जुलै 2025 रोजी दुपारी 2.00 वाजता प्राचार्य मा.डॉ. सरोज पाटील यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. कार्यक्रमाला महाविद्यालयाचे सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक, ग्रंथपाल, संशोधक विद्यार्थी व पदवीपूर्व/पदव्युत्तर विद्यार्थी समक्ष आणि ऑनलाइन उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक अंतर्गत MUHS Digital Library consortia (EBSCO) ह्यांची उपलब्ध ई-स्त्रोतांची ओळख करून देणे, तसेच त्याचा प्रभावी वापर कसा करता येईल हे विद्यार्थ्यांना समजावून सांगणे हे होते. या प्लॅटफॉर्मद्वारे विविध *e-books, e-journals, Ayurveda resources*, यांची प्राध्यापक, ग्रंथपाल, संशोधक व पदवीपूर्व/पदव्युत्तर विद्यार्थी यांना महाविद्यालयाकडून मोफत सुविधा मिळणार असून या सेवांचा अधिक प्रभावी वापर कसा करायचा, हे शिकवण्यासाठीच MUHS विद्यापीठाकडून हा ऑनलाईन orientation कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

Zoom मीटिंग पॅनलिस्ट म्हणून मध्ये डॉ.मंजिरी देशपांडे,डॉ.इंदिरा उजागरे आणि डॉ.हजरनवीस उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सादरीकरण MUHS विद्यापीठाकडून उपस्थित मार्गदर्शक, श्री.गौरव दाते Training Specialist - EBSCO Information Services यांनी केले. Zoom मीटिंग द्वारे त्यांनी खालील मुद्द्यांवर सविस्तर मार्गदर्शन केले.

- MUHS डिजिटल कन्सोर्शिया म्हणजे काय?
- उपलब्ध ई-स्त्रोत: e-Journals, e-Books, Research Databases
- विद्यार्थ्यांसाठी लॉगिन प्रक्रिया, Remote Access वापर
- संशोधनासाठी SMART Images and video Tools वापरण्याची पद्धत
- Open Access Resources आणि त्यांचा अभ्यासात वापर

विद्यार्थ्यांनी यामध्ये सक्रिय सहभाग घेतला व प्रश्नोत्तर सत्राद्वारे शंका स्पष्ट केल्या.त्याचे निरसन श्री.गौरव दाते यांनी प्रभावीपणे केले.ग्रंथालय विभागप्रमुखांनी (पदवी आणि पदव्युत्तर ) MUHS कन्सोर्शियाचा उपयोग वाढविणे आवश्यक असल्याचे सांगितले व सर्व विभागांनी आपल्या विद्यार्थ्यांना त्याचा नियमित व प्रभावी वापर करण्यास प्रोत्साहन द्यावे, असे मत मांडले आणि सर्वांचे आभार मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रंथालय व ऑफिस विभागाने परिश्रम घेतले. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांकडून व प्राध्यापकांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.

**सौ. प्रिया पवार**
ग्रंथपाल - पदव्युत्तर ग्रंथालय

**सौ.कविता टेमघरे**
ग्रंथपाल - पदवीपूर्व ग्रंथालय

टिळक आयुर्वेद महाविद्यालय, पुणे